गोपनीय/त्वरीत

कार्यालय अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर
ईमेलः-senag@mahapwd.com
Tel.No. २५६०४०९

क्रमाकः- आस्था का.३(प्रली) /वनवि/९२८ /०७ दिनांक :- २५/५/२००७

प्रति,

विशेष कार्य अधिकारी तथा पदसिध्द,
उप विकास आयुक्त ( रो.ह.यो )
विभागीय आयुक्त कार्यालय,
नागपूर

विषय :- नागपूर जिल्हयातील हिंगणा वनक्षेत्रात वनविभागाने बांधलेल्या रस्त्याच्या बांधकामात भ्रष्टाचाराबावत विभागीय चौकशीसाठी अतिप्रदानाची रक्कम निश्चित करण्याबाबत.

संदर्भ :- आपले अर्ध शासकीय पत्र क्रमांक रोहयो/अका२/वनवि ३७७/०७ दिनांक ७.३.२००७

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये आपणास कळविण्यांत येते की, विभागीय आयुक्त नागपूर यांचे पत्र क्रमांक रो.ह.यो./शा.अ १/कावि/१७३८/२००४ दिनांक ८/१०/२००४ अन्वये शासन परिपत्रक दिनांक २८/८/२००३ मध्ये दिलेल्या सुचनेनुसार अंतिम प्रदानाची रक्कम निश्चित करुन त्याबाबतचा अहवाल हया कार्यालयाचे गोपनीय पत्र क्रमांक का.३/प्रली/वनवि/२२४/२००५ दिनांक १२/७/२००५ अन्वये अहवाल सादर केला आहे.

आपले उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये या कार्यालयास असे कळविले आहे की, जबाबदार असलेल्या संबंधीतावर प्रत्येकाची स्वतंत्र जबाबदारी निश्चित करण्यात आलेली नाही.

शासन नियोजन विभाग परिपत्रक क्रमांक रोहयो-१२०३/प्र.४५/रोहयो-२ दि. २८.८.२००३ मध्ये असे नमुद केले आहे की, अतिप्रदान झालेल्या रक्कमेची निश्चिती झाल्यानंतर अधिक्षक अभियंता यांनी तसा अहवाल संबंधित जिल्हाधिकारी व आयुक्त कार्यालयास सादर करावा. त्यानुसार अतिप्रदान झालेल्या रक्कमेची निश्चिती करुन अहवाल सादर केला आहे.

तरी याबाबत आपणास कळविण्यांत येते की, श्री. आर.एन. रॉय, उपवनसंरक्षक, श्री. सरफराज खान, उपवन संरक्षक श्री. डी.पी. सदावर्ती, सहा. उपवनसंरक्षक व श्री. के.एस. डोंगरे वनपरिक्षेत्र अधिकारी हयांचे कर्तव्य व जबाबदारी काय आहे, हयाबाबत हे कार्यालयास माहिती नाही.

परंतु महाराष्ट्र सा.बां. नियम पुस्तीका सहावी आवृत्ती १९८४ मधील परिशिष्ट २४ मधील नियम ११ मध्ये असे नमुद केले आहे की, ज्या प्रकरणी कामाचे एकुण मुल्य रु. १ लाखापेक्षा अधिक असेल अशा बाबतीत अंतिम मोजमापेही उप विभागीय अभियंता /उप

विभागीय अधिकारी या दर्जाच्या अधिका-यांने स्वतः नोंदवावित किंवा त्यांने कनिष्ठ अभियंत्याने नोंदविलेल्या अशा मोजमापाची शतप्रतिशत तपासणी करावी. फुटकळ काम निविदेवरील किंवा दरसुचीवर केलेल्या व ज्या कामाचे अंतिम देयक एक महिन्यात प्रदान केली आहेत त्यापैकी ५ टक्के देयकाची तपासणी कार्यकारी अभियंत्याने करावी तसेच अशा प्रत्येक देयकातील केलेल्या कामाच्या ५ टक्के मुल्य कामाची तपासणी करावी. ह्या व्यतिरिक्त ज्या कामातील एका बाबीचे अंदाजित मुल्य ५ टक्के तपासणी करावी . इतर सर्व प्रकरणाची ज्यावेळी अंतिम देयकाची एकुण रु. १ लाखापेक्षा अधिक असेल त्यावेळी कार्यकारी अभियंता अंतिम मोजमापाची किमान ५ टक्के तपासणी केलीच पाहिजे.

वरील नियमानुसार जबाबदार व्यक्तीच्या नावा समोर रक्कम दर्शविण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिका-याचे नांव व पदनाम | अतिप्रदान झालेली रक्कम व त्याची जबाबदारी | वसुलीची रक्कम. |
|---|---|---|---|
| १. | श्री. आर.एन. रॉय उपवनसंरक्षक | १८,९९,८६३ च्या ५ टक्के | रु. ९४,९९३.०० |
| २. | श्री. सरफराज खान उपवनसंरक्षक | १८९९८६३ च्या ५ टक्के | रु. ९४,९९३.०० |
| ३ | श्री डी.पी. सदावर्ती सहा. उपवनसंरक्षक | १८,९९,८६३ च्या ४५ टक्के | रु. ८,५४,९८.०० रु. ८५४९३९.०० |
| ४. | श्री. के.एस. डोंगरे वनपरिक्षेत्र अधिकारी. | १८,९९,८६३ च्या ४५ टक्के | रु. ८,५४,९३९.०० |

यास्तव आपणास विनंती करण्यात येते की, सदर अधिकारी हयांची जबाबदारी व कर्तव्य पाहुन आपण आपल्या स्तरावर त्यांचे विरुध्द वसुलीची जबाबदारी निश्चित करण्यांत यावी.

अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ,
नागपूर